



डॉ. प्रज्ञा कुलकर्णी
9673996566

# परंपरा आणि नवतेचा संगम : डेक्कन कॉलेज

**पुणे शहराबाहेर आळंदी रस्त्यावर असणाऱ्या पाश्चात्य स्थापत्य शैली जपणाऱ्या या अस्सल देशी दगडांच्या वास्तूने उन, वारा, पाऊस झेलत आजवर अनेक संशोधकांना संशोधन कार्याला आवश्यक अशी शांतता मिळवून दिली आहे. ही भूमी, ही वास्तू विलक्षण ताकदीची आहे असं वाटतं! आळंदी-पुणे या मार्गावर पायी जाताना ज्ञानोबामाउलींची पावलं कधीतरी या दिडशे एकरात नक्कीच पडली असतील...**

'सं श्रुतेन गमेमहि' हे ध्येयवाक्य सार्थ ठरवत गेली दोनशे वर्षे जगभरातल्या विद्वानांना एकत्र आणत अध्ययन, अध्यापन आणि संशोधनाची परंपरा जोपासणारी पुणे शहरातली नावाजलेली संस्था म्हणजे डेक्कन कॉलेज! देशातलं तिसरं, महाराष्ट्रातलं पहिलं असं हे महाविद्यालय. पुणे शहराला'विद्येचं माहेरघर" म्हणून ओळख मिळण्यापूर्वीची सगळ्यात जुनी शिक्षणसंस्था 2020-21 या वर्षात दोनशे वर्षांची होते आहे! परंपरेचा अभ्यास आणि जतन नवनवीन तंत्रांच्या साहाय्याने करणाऱ्या या संस्थेच्या द्विशतकपूर्तीच्या निमित्ताने संस्थेच्या अभिमानस्पद भूतकाळाची, समृद्ध वर्तमानाची आणि भविष्यकालीन महत्त्वाकांक्षी योजनांची ओळख करून देण्याचा हा एक प्रयत्न!

आजमितीस अभिमत विद्यापीठाचा दर्जा असणारी ही संस्था स्थापनेपासून आजच्या रुपापर्यंत पाच स्थित्यंतरांमधून गेली आहे. पेशवाईच्या काळात विद्वान आणि गुणीजनांचा सन्मान प्रतिवर्षी श्रावण महिन्यात दक्षिणा देऊन केला जात असे. पेशवाईच्या अस्तानंतर इंग्रजांना त्यांचे बस्तान इथे बसवावयाचे होते. त्यासाठी सेरदार दाभाडेंनी सुरु केलेली, पेशवाईत रुजलेली विद्वानांच्या गौरवाची परंपरा 'संस्कृत पाठशाळेच्या' रुपाने चालू ठेवण्याचे बॉम्बे प्रेसिडेन्सीचे (मुंबई) तत्कालीन गव्हर्नर माउन्ट स्टुअर्ट एल्फिन्स्टन यांनी ठरवले. त्यांनी काढलेल्या जाहिरनाम्यात ब्रिटिश सरकार पेशव्यांच्या सर्व धार्मिक, शैक्षणिक आणि सेवाभावी संस्थांचे रक्षण करेल असे वचन दिले. त्या आश्वासनाचे पालन करत 6ऑक्टोबर 1821 रोजी विजयादशमीच्या मुहूर्तावर



संस्कृत पाठशाळेचे विलिनीकरण करुन 'हिंदू कॉलेजची' स्थापना विश्रामबागवाडा येथे झाली.प्राचीन शास्त्रांच्या अभ्यासक्रमाबरोबरच हिंदू कायदा आणि गणित या विषयांचा अंतर्भावही अभ्याक्रमात केला गेला आणि 143 विद्यार्थ्यांना प्रवेश देऊन संस्थेचे कामकाज सुरु झाले.1851 साली हिंदू कॉलेज आणि इंग्रजी कॉलेज एकत्र करुन 'पूना कॉलेज' नावाने मुंबई विद्यापीठाच्या अधिपत्याखाली संस्थेचे कामकाज सुरु झाले. या महाविद्यालयात सर थॉमस कैन्डी (1851-57), सर एडविन अर्नाल्ड(1857-60), डब्लू. ए.रसेल (1860-62),विल्यम वर्डस्वर्थ(1862-74) यासारख्या व्यक्ती प्राचार्य म्हणून काम करत होत्या.

त्यानंतर 1868 मध्ये नीओ गॉथिक शैलीचे बांधकाम असणाऱ्या स्थापत्यकलेचा अनोखा नमुना ठरणाऱ्या इमारतीत संस्थेचे डेक्कन कॉलेज नावाने स्थलांतर झाले. मुख्य शहरापासून हे ठिकाण दूर असल्याने शहरात नवनवीन शिक्षणसंस्था स्थापन झाल्यावर डेक्कन कॉलेजमध्ये येणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या घटली. त्यामुळे1934 ते 1939 या काळात संस्थेचे कामकाज थांबले होते. संस्थेच्या माजी विद्यार्थ्यांच्या पुढाकाराने17ऑगस्ट 1939 ला ते पुन्हा नव्याने पदव्युत्तर अध्यापन आणि संशोधन संस्था या रुपाने चालू झाले. 1990 मध्ये विद्यापीठ अनुदान आयोगातर्फे संस्थेला अभिमत विद्यापीठाचा दर्जा मिळाला.

जमशेटजी जिजीभॉय यांनी दिलेल्या एक लाख पंचवीस हजार रुपयांच्या देणगीमधून 150 एकर जागेवर 1864 ते 1868 या काळात संस्थेची इमारत बांधली आहे. ही इमारत संपूर्णपणे दगडांमध्ये बांधली आहे. लाल रंगाच्या पत्र्याचे उतरते छत, गोलाकार स्तंभ, ऐसपैस जिने, प्रवेशद्वाराच्या रेखीव कमानी आणि संपूर्ण इमारतीत दगडी खांबांवर दिसणारी नाजूक, कोरीव आणि वैविध्यपूर्ण नक्षी-सारंच स्तिमीत करणारं, नजर खिळवणांर आणि देखणं! मूळ वास्तूच्या आसपास नव्याने बांधल्या गेलेल्या इतरही काही इमारती आहेत. इमारत बांधली त्यावेळच्या संशोधक, अध्यापक आणि विद्यार्थ्यांना लावलेली वडाची झाडे संस्थेच्या आवारात आजही मूळ धरुन आहेत. शहरापासून दूर असल्याने संशोधनाला पोषक शांतता, निवांतपणा डेक्कन कॉलेजमध्ये आजही अनुभवता येतो.

पुणे शहराबाहेर आळंदी रस्त्यावर असणाऱ्या पाश्चात्य स्थापत्य शैली जपणाऱ्या या अस्सल देशी दगडांच्या वास्तूने उन, वारा, पाऊस झेलत आजवर अनेक संशोधकांना संशोधन कार्याला आवश्यक अशी शांतता मिळवून दिली आहे. ही भूमी, ही वास्तू विलक्षण ताकदीची आहे असं वाटतं! आळंदी-पुणे या मार्गावर पायी जाताना ज्ञानोबामाउलींची पावलं कधीतरी या दिडशे एकरात नक्कीच पडली असतील...लाल महालातून सवंगड्यांबरोबर रपेट मारायला निघालेल्या शिवबाचा घोडा खचितच कधीतरी इथे आला असेल...मुख्य इमारतीच्या ओसरीवर विद्यार्थीदशेतले बाळ गंगाधर टिळक कधीतरी गप्पांची मैफल जमवून निवान्त बसले असतील. या ग्रंथालयाच्या शांततेत एखादा लखलखीत विचार इरावतीबाईंच्या मनात येऊन गेला असेल. या सगळ्या स्मृतींनी एक अमीट ठसा इथल्या स्थिरचरावर उमटवला आहे. 1939 साली पदव्युत्तर आणि संशोधन संस्था म्हणून नामांतर झाल्यावर संस्थेत

डॉ. हसमुख धीरजलाल, सांकलिया, डॉ.सुमित्र मंगेश कत्रे, डॉ. इरावती कर्वे, डॉ. अशोक केळकर,डॉ.शेजवलकर, डॉ. मधुकर ढवळीकर यासारख्या अनेक मातब्बरांनी अनेकविध विषयांवर संशोधन केले. पुरातत्त्व, भाशाषास्त्र, संस्कृत कोशनिर्माण यांसारख्या दुर्मीळ विषयांवर संशोधन करणाऱ्या या संस्थेने अत्यंत मूलगामी संशोधनाने संपूर्ण देशाला ज्यांचा अभिमान वाटावा असे अनेक पद्मभूषण,पद्मश्री, साहित्य अकादमी पुरस्कार, आणि राष्ट्रीय पातळीवरचे संस्कृतपंडित पारितोषिकाचे मानकरी दिले आहेत. याखेरीज अनेक विषयांवर इतिहासाचे पुनर्लेखन करायला लावणाऱ्या दर्जाचे सकस संशोधन या वास्तूत झालं. 1948 सालापासून इथे चालू असणाऱ्या संस्कृत कोश प्रकल्पाच्या पूर्वतयारीच्या निमित्ताने वेदांपासून ते अठराव्या शतकातील ग्रंथांपर्यंतचे संपूर्ण संस्कृत वाङ्मय या एकाच ठिकाणी वाचलं आणि अभ्यासलं गेलं आहे. 1990 साली संस्थेला अभिमत विद्यापीठाचा दर्जा मिळाला आणि परंपरेच्या जपणुकीला आणि संशोधनाला भविष्यातही जपण्याचं जणू आश्वासनच मिळालं.

सध्या संस्थेमध्ये पुरातत्त्वभाग, भाशाषास्त्रविभाग, संस्कृत कोश विभाग असे तीन विभाग आहेत. या तीनही विभागांमधे पदव्युत्तर शिक्षणासाठी अध्यापन केले जाते आणि संशोधनासाठी मार्गदर्शनही केले जाते. संस्थेच्या तीनही विभागांमधे निरनिराळ्या संलग्न विषयांचे कालावधीचे प्रमाणपत्र अभ्यासक्रम राबवले जातात. यामध्ये अंतर्जलीयपुरातत्त्व बौद्धपुरातत्त्व वारसास्थळांचे जतन आणि संरक्षण, पर्शीयन, जपानी, इटालियन यासारख्या भाषा, भाषाशास्त्राची ओळख, संस्कृत संभाषण, शास्त्रीय संशोधन पद्धती इत्यादी विषयांचे प्रशिक्षण दिले जाते. संस्थेमध्ये असणाऱ्या पुरावनस्पतीशास्त्र, पुरारसायनशास्त्र, पुराजीवशास्त्र, भाषाशास्त्र या विषयांच्या प्रयोगशाळा आणि संस्कृत कोशविभागात सुरु असणारे महाकाय संस्कृत-इंग्रजी कोशाचे काम या सगळ्यात घेतलेला सक्रिय सहभाग विद्यार्थी आणि नवसंशोधकांना अनुभवसमृद्ध करतो. पुरातनातल्या पुरातन गोष्टींचं अध्ययन, अध्यापन आणि संशोधन नव्यातलं नवं तंत्र वापरुन केलं जावं आणि ते प्रत्येक जिज्ञासूपर्यंत पोहोचावं यासाठी संस्था नेहमीच प्रयत्नशील होती, आहे आणि राहील! संस्थेच्या विविध प्रयोगशाळा याकामी मोलाची भूमिका बजावतात.

### पुरातत्त्वविभाग

भारतात तसेच विदेशातही पुरातत्त्वविषयक संशोधन संस्थांमध्ये आपल्या वैशिष्ट्यपूर्ण संशोधन कार्यामुळे प्रसिद्ध असणारा हा विभाग! या ठिकाणी पदव्युत्तर शिक्षणाच्या अभ्यासक्रमांबरोबरचसंशोधनात्मक पदव्युत्तर शिक्षणाचीही (PhD) सोय आहे. पुरातत्त्वाशी निगडित अनेक विषयांवर संशोधन इथे केले जात आहे. देशोदेशीच्या विद्यापीठांबरोबरच्या सहयोगाने इथे अनेक प्रकल्प चालू असतात. इथे असणाऱ्या विविध विषयांच्या प्रयोगशाळा हे या विभागाचे वैशिष्ट्य आहे. पुरावनस्पतीशास्त्र, पुरारसायनशास्त्र, याबरोबरच पुराजीवशास्त्राची प्रयोगशाळा भारतात या ठिकाणाशिवाय क्वचितच कुठे असेल. इथल्या प्रयोगशाळांमध्ये एक्स-रे-डिफ्रॅक्शन मशीनसारखी अद्ययावत यंत्रसामग्री उपलब्ध आहे. या यंत्राच्या साहाय्याने उत्खननादरम्यान सापडणाऱ्या वस्तूंच्या मातीचे पृथक्करण करून त्यावरुन त्या मातीचे उगमस्थान निश्चित करता येते. अनेक महत्त्वपूर्ण उत्खनन प्रकल्पांसाठी संस्थेतील तज्ज्ञांनी आपले योगदान दिले आहे. चिक्री, मोरगांव, भीमबेटका, तिकोडा, सिंघी तलाव, ईसमपूर, नेवासा, इनामगाव, जुन्नर, बालाथल, नवदातोली, कोटडा भडली, चौल, राखीगढी, गिलुंड, हरिराजपूर, हडप्पा संस्कृतीची हरियाणा आणि गुजरात मधील उत्खनने अशी अनेक उदाहरणे देता येतील.

रुपकुंड येथे बर्फात गाडल्या गेलेल्या माणसांच्या डी.एन.ए. च्या अभ्यासाचा प्रकल्प यशस्वी करण्यात डेक्कन कॉलेजमधील तज्ज्ञांचा महत्त्वाचा वाटा होता. राजस्थानातील गिलुंड, महाराष्ट्रातील जुन्नर, भोज, लातूर कोकणातील चौल, केळशी, कर्नाटकातील इमपूर यासारखे काही महत्त्वपूर्ण प्रकल्प भारतीय इतिहासाच्या अभ्यासाच्या साधनांमध्ये मोलाची भर घालतात. देशात असे एखादेच राज्य असेल जिथे संस्थेने उत्खनन प्रकल्प राबवला नाही. पश्चिम भारतातील देवळांच्या सर्वेक्षणाचा प्रकल्प, गुंफांच्या रचनांचा अभ्यास करण्याचा प्रकल्प संस्थेच्या तज्ज्ञानी यशस्वीरित्या पूर्ण केला आहे.आजही विभागातर्फे अनेक उत्खननांचे प्रकल्प चालू आहेत.

### भाषाशास्त्रविभाग

भारतातील भाषाशास्त्राच्या अभ्यासाला एक वेगळे वळण देणारा हा भाशाशास्त्र विभाग 1939 साली डॉ. सु.मं. कत्रे यांच्या नेतृत्वाखाली सुरु झाला. भारतात भाषाशास्त्र विषयात काम करणाऱ्या संशोधकांच्या पहिल्या फळीतील बहुतेक सर्व विद्वानांनी याच विभागात प्रशिक्षण घेतले आहे. 1950 च्या दशकात इथे घेतली गेलेली समरस्कूल्स आणि विंटरस्कूल्स अनेक भाषाविद्वानांना घडवण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरली आहेत. भाषाशास्त्रविषयातील पदव्युत्तर व पदव्युत्तर संशोधनात्मक (PhD) शिक्षणाची सोय इथे आहे.

भारतीय भाषांची चार भाषा

परिवारात विभागणी होते. या चारही भाषापरिवारांचा अभ्यास इथे केला गेला आहे. मराठी भाषेच्या विविध बोलींचा (Dialects) अभ्यास या विभागात पूर्वीही केला गेला आहे. ॲस्ट्रोएशियाटिक परिवाराच्या मुंडा भाषा, तिबेटोबर्मन परिवाराच्या आदिवासी भाषा, चिंताजनक परिस्थितीत असणाऱ्या निहाली कोलमी सारख्या भाषांमधील नोंदी करणे स्थलांतरितांची भाषा (ज्यामधे गुजराती आणि कोकणी भाषिक स्थलांतरिताचा अभ्यास). या विषयावरच्या संशोधनाबरोबरच सध्या मराठी भाषेच्या विविध बोलींची तपशीलांसह नोंदणी करण्याचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प इथे सुरु आहे. मराठी विश्वकोशाच्या भाषाशास्त्रासारख्या विषयांवरच्या अभ्यासपूर्ण नोंदी लिहिण्याचे काम संस्थेतील संशोधक करत आहेत. संपूर्णतया कार्यरत असणारी ध्वनिप्रयोगशाळा (Phonetic Laboratory) हे या विभागाचे वैशिष्ट्य आहे.

**संस्कृतकोश विभाग**

इतर अनेक संशोधन संस्थापासून डेक्कन कॉलेजला वेगळे ठरवणारा, जागतिक स्तरावर एकमेव असणारा हा विभाग संस्थेला ललामभूत आहे. 1948 साली डॉ. सु.मं.कत्रे यांच्या मार्गदर्शनाखाली 'ऐतिहासिक तत्त्वाधिष्ठित, ज्ञानकोशात्मक अशा संस्कृत-इंग्रजी महाशब्दकोशा' च्या निर्मितीला सुरुवात झाली. या प्रकल्पात ऋग्वेदापासून एकोणिसाव्या शतकापर्यंतच्या सर्व काळाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या 1500ग्रथांचा वापर केला जातो. 62 विद्या शाखांमधून निवडलेल्या त्या 1500 ग्रंथांमधून 90 लाखांहून अधिक उद्धरणे अकारादिक्रमाने नोंदवून एक अवाढव्य असे स्क्रिप्टोरियम प्रकल्पाच्या सुरुवातीला तयार केले आहे. याच काळात अनेक दुर्मिळ संस्कृत कोशांच्या चिकित्सित आवृत्ती तयार करुन संस्थेने प्रकाशित केल्या आहेत.

हे स्क्रिप्टोरियम म्हणजे 4000 वर्षांच्या इतिहासातील वीस लाखांहून अधिक संस्कृत शब्दांचा इतिहास रेखाटणारा अमूल्य ठेवाच! हा अद्भूत, अमूल्य ठेवा दैनंदिन प्रकल्प कार्यासाठी तर वापरला जातोच, पण याशिवायही अनेक देशी-विदेशीअभ्यासकांनी आपल्या संशोधन कार्यासाठी त्याचा वापर केला आहे. 1976 साली डॉ. अ.मा घाटगे यांच्या प्रधान संपादकत्वाखाली कोशाचा पहिला भागप्रकाशित झाला. अशा प्रकारे चौतीस खंड प्रकाशित होऊन आजमितीस पस्तीसाव्या भागाचे काम अंतिम टप्प्यात आहे. या कोशात प्रत्येक शब्दाचा कालक्रमानुसार अर्थामध्ये होणारा बदल उद्धरणांसह दिला आहे. उपलब्ध असणाऱ्या सर्व संदर्भांचा विचार केला जात असल्याने सध्या उपलब्ध संस्कृत-जर्मन, संस्कृत-मराठी, संस्कृत-इंग्रजी शब्दाकोशांच्या तुलनेत या कोशाचे काम अफाट आहे. आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने दैनंदिन कामकाज केले जात असल्याने कामातील सातत्य अवघड काळातही जपणे शक्य झाले आहे. 2010 सालापासून याविभागात नवीन कोशकर्ते निर्माण करण्यासाठी संस्कृत आणि कोशशास्त्र या विषयावरच्या पदव्युत्तर शिक्षणाची (M.A.in Sanskrit and Lexicography) तसेच याविषयातील संशोधन पदवी साठीचे(PhD) चे संशोधन करण्याचीही व्यवस्था झाली आहे. कोशनिर्मिती बरोबरच या विषयावरील संशोधनाला चालना मिळाली आहे. संस्कृत भाषेची ओळख करुन देणारे छोटेखानी अभ्यासक्रम हा विभाग चालवत असतो. नजिकच्या भविष्यात यासारखेच अन्य अभ्यासक्रम सुरु करण्याचा विचार संस्थेचे पदाधिकारी करत आहेत.

संस्थेचे वैशिष्ट्यपूर्ण अवाढव्य ग्रंथालय ही एक स्वतंत्र विभागच आहे. 1588 साली प्रसिद्ध झालेल्या सर्वात जुन्या पुस्तकापासून अगदी आधुनिक ई-नियतकालिकांपर्यंत असंख्य प्रकारची, निरनिराळ्या विषयांवरची पुस्तके इथे जतन केली आहेत. संस्थेच्या आवारात दोन वैशिष्ट्यपूर्ण संग्रहालये आहेत. संस्थेने आजवर केलेल्या उत्खननांमध्ये सापडलेल्या वस्तूंचे आणि पुरातत्त्व संशोधनाविषयीची माहिती देणारे पुरातत्त्व संग्रहालय आणि मराठयांच्या इतिहासाची विविध साधने, दफ्तरे, बखरी, दस्तावेज यासारख्याचे जतन करणारे मराठा इतिहास संग्रहालय. या दोनही संग्रहालयातल्या जतन केलेल्या सामग्रीचा खजीना जिज्ञासूंना पहाण्यासाठी उपलब्ध आहे.

द्विशताब्दी वर्षात अनेक कार्यक्रमांद्वारे जनसामान्यांपर्यंत पोहोचण्याचा संस्थेचा विचार आहे. त्यासाठी विविध विषयांवर शैक्षणिक व्याख्यानमाला, तसेच विविध विषयांवरील संशोधनाला उत्तेजन देऊन ते लघुग्रंथमालेच्या रुपात प्रसिद्ध करणे, निरनिराळ्या विषयांवर अभ्यासक्रम सुरु करणे यासारखे उपक्रम राबवले जातील. हे सर्व कार्यक्रम तंत्रस्नेही पद्धतीने कार्यवाहीत आणण्याचा संस्थेचा मानस आहे. प्राचीन भारतीय इतिहास, संस्कृती, पुरातत्त्व, भाषा, भाषाशास्त्र, संस्कृत या सर्वाच्या जतन आणि संवर्धनाचे काम इथे पूर्वीही चालू होतं...आजही याविषयांचे अनेक प्रकल्प सुरु आहेत. गोरेवाडा या उत्खनन स्थळी उभारले जाणारे थीम पार्क, मराठी भाषेच्या बोलींच्या अभ्यास आणि नोंदींचा प्रकल्प, संस्कृतचा अवाढव्य कोश हे आणि यासारखे प्रकल्प संस्थेला आगामी काळात भरीव कामगिरी दाखवण्यास साहाय्यभूत ठरतील.